महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं दिनांक :- ०९ डिसेंबर, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- गुणपत्रक, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत**
**संदर्भ :- जाहिरात क्रमांक ०५१/२०२२, ०५९/२०२२, २६१/२०२१ व २६२/२०२१**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या खालील परीक्षांचे अंतिम निकाल जाहीर करण्यात आले आहेत:-

| **जाहिरात क्रमांक** | **परीक्षा** | **निकालाचा दिनांक** |
|---|---|---|
| ०५१/२०२२ | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२१- सहायक कक्ष अधिकारी | दिनांक ६ डिसेंबर २०२२ |
| ०५९/२०२२ | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२१-दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | दिनांक ५ डिसेंबर २०२२ |
| २६१/२०२१ | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२०- राज्यकर निरीक्षक | दिनांक १ डिसेंबर २०२२ |
| २६२/२०२१ | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२०- सहायक कक्ष अधिकारी | दिनांक ३० नोव्हेंबर २०२२ |

**२.** सदर परीक्षांस उपस्थित असलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील 'View' अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, तसेच गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करू इच्छिणा-या उमेदवारांना फेरपडताळणीकरिता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. :-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉग-इन करावे.

(३) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(४) उपलब्ध होणा-या गुणपत्रातील गुणांची फेरपडताळणी करावयाची असलेल्या परीक्षेची निवड करून 'Save' बटणवर क्लिक करावे.

(५) सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरिताची सदर वेबलिंक दिनांक ०९ डिसेंबर, २०२२,१२:०० ते दिनांक १८ डिसेंबर, २०२२, २३:५९ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**४.** उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरिता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडी वर संपर्क साधता येईल.

सहसचिव (माहिती तंत्रज्ञान)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई